जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

गुरुवार दि.२७ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# नीलम गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले:त्या काहीही खोटे बोलल्या नाहीत-एकनाथ शिंदेकडून पाठराखण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या एका चर्चा सत्रात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे गटावर तसेच उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळते, असे विधान त्यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर ठाकरे गटातील नेत्यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर टीकेची झोड उठवली. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांची पाठराखण केली आहे. अंधेरी येथील जाहीर सभेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, नीलम गोऱ्हे हे दिल्लीच्या व्यासपीठांवरुन एक वाक्य बोलल्या आता ते व्यासपीठ बरोबर होते की चुकीचे होते हा भाग वेगळा. परंतु ते काही जणांना एवढे झोंबले की मिरच्या लागल्या. हा एकनाथ शिंदे त्यांना पुरुन उरला होता. गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढले, त्यामुळे त्यांना मिरची लागली. नीलम गोऱ्हेंच्या आधीही अनेक लोक हे बोलले आहेत.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ना खोके नाही कंटेनर लागतात, असे राज ठाकरे बोलले होते. नारायण राणे, रामदास कदम, नितेश राणे असे अनेकजण बोललेत. हे काही नवीन नाही. पण नीलम ताई बोलल्यानंतर त्यांच्या मागे इतके लागले, त्यांना इतक्या मिरच्या लागल्या, पण नीलम ताईंवर इतक्या खालच्या दर्जावर जाऊन बोलणे, आरोप करणे त्यांना शोभत नाही. त्या खरे बोलल्या. काहीही खोटे बोलल्या नाहीत. आम्ही देना बँक आहोत आणि समोर लेना बँक आहेत, म्हणून ते जे बोलल्या ते कटू सत्य आहे.नीलम गोऱ्हे या महिलांवर अत्याचार झाला किंवा इतर काहीही झाले तर त्या पहिल्या धावून जायच्या, तेव्हा नीलम ताई चांगल्या होत्या. आताही शक्ती विधेयकात त्यांचे मोठे योगदान आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्या काम करतात. हीच पोट दु:खी आहे. ती पोट:दुखी थांबत नाही, कारण ते डॉक्टरकडून औषध घेत नाहीत, कंपांऊडरकडून औषध घेतात, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला आहे.



## देगलूर येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या सदस्य नोंदणीला सुरुवात

# राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर | जयपाल दावनगीरकर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार नांदेड जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी देगलूर तालुक्याच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियान देगलूर राष्ट्रवादी काँग्रेस संपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश संघटक मिलिंद कावळगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस



पार्टीचे देगलूर तालुका अध्यक्ष राहुल देसाई देगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष देवेंद्र मोतेवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका उपाध्यक्ष माधवराव इंगळे (शाखा पाटील), सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष बालाजी भूतनरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका उपाध्यक्ष पांडुरंग राजुरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष मलिकार्जुन कडलवार,कोतावार सावकार,राष्ट्रवादी काँग्रेस शहर कार्याध्यक्ष ओम महाजन,राष्ट्रवादी युवक काँग्रेस माजी तालुका अध्यक्ष नरेश पाटील अल्लूरकर, राष्ट्रवादी युवक विधानसभा सरचिटणीस हणमंत पांडवे,तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्याने उपस्थित होते.

## भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघाचे

# आमदार संतोष भाऊ दानवे यांची पंचायतराज कमिटीचे अध्यक्षपदी निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

भोकरदन – जाफराबाद विधानसभा मतदारसंघाचे युवा आमदार संतोष पाटील दानवे यांची पंचायतराज कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे त्यांच्या निवडीबद्दल पारद बु येथील माजी सभापती श्री परमेश्वर पाटील लोखंडे व गणेश शिवराम लोखंडे, सागर देशमुख ,शिवा पाटिल लोखंडे,पवन लोखंडे ,देवेंद्र लोखंडे, संजय लोखंडे , दिलीप बेराड,यांनी गुलालाची उधळण करून व फटाक्यांचे अतिश बाजी करून या निवडीचे स्वागत केले आहे परमेश्वर पाटील लोखंडे यांच्याशी फोनवर संपर्क केला असता त्यांनी श्री संतोष पाटील दानवे यांच्या निवडीबद्दल दोन शब्दात आपल्या भावना व्यक्त केलेले आहे भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघातून लाडकं नेतृत्व या आमच्या तालुक्याला लाभलेला आहे



आणि या लाडक्या नेतृत्वाला आज पंचायत राज कमिटीच्या अध्यक्ष रूपाने सर्वसामान्यांची कामे असो व राज्यातील कामे असो करण्याची एक सुवर्णसंधी आज आमच्या नेतृत्वाला मिळालेली आहे.


महाराष्ट्र विधीमंडळ समित्यांवर जाहीर झालेल्या नियुक्त्यांमध्ये भाजपकडून पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदी भोकरदन–जाफ्राबादचे आमदार संतोष दानवे यांची निवड करण्यात आली आहे.विशेष म्हणजे यापुर्वी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे आमदार असतांना त्यांनाही या पदावर काम करण्याची संधी मिळाली होती विशेष म्हणजे संतोष दानवे यांच्या रूपाने भोकरदन तालुक्याला चौथ्यांदा पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला आहे. पहिल्यांदा १९८५ ते ९० च्या कार्यकाळात काँग्रेसचे आमदार संतोषराव दसपुते हे पंचायत राज समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतर युती सरकारच्या काळात ९५ ते ९९ दरम्यान रावसाहेब दानवे अध्यक्ष होते. तर आघाडी सरकारच्या कार्यकाळात अजित पवारांचे विश्वासू म्हणून ओळखले जाणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चंद्रकांत दानवे यांना अध्यक्ष पद मिळाले होते. आता महायुती सरकारच्या देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात युवा आमदार संतोष दानवे यांना हे पद मिळाले आहे.

# पुणे येथील मातंग महाअधिवेशनात सामील व्हा-रविंद्र गायकवाड कुदळेकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | किशन गायकवाड**

१ मार्च २०२५ रोजी पुणे येथे लहुजी शक्ती सेनेच्या वतीने मातंग समाजांचे महाअधिवेशन आयोजित केलेले आहे. सदरील अधिवेशनाला अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य समाजभूषण किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. तरी उमरी तालुक्यातुन शेकडो कार्यकर्त्यांनी पुणे येथील दशभुजा गणपती मैदान सहकार नगर येथे संध्याकाळी सहा वाजता



संपन्न होत असलेल्या मातंग समाजाचे महा अधिवेशनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचे युवा प्रदेश अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्ष अनुसूचित जाती मोर्चाचे उमरी तालुका अध्यक्ष रवींद्र गायकवाड कुदळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आव्हान केले आहे.

# पत्रकार रवींद्रनाथ ठाकूर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा





लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

वादळवार्ता चे रोखठोक पत्रकार तसेच आष्टी तालुका प्रतिनिधी श्री रवींद्रनाथ ठाकूर यांचा वाढदिवस आष्टी येथे साजरा करण्यात आला.या प्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे, सकाळचे पत्रकार शेख निसार,युवा सोबतीचे पत्रकार जावेद पठाण, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके सर,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक अण्णासाहेब घोडके सर,स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे संचालक संतोष पोकळे सर,ड संभाजी दहातोंडे साहेब,लोकशाही पत्रकार संघाचे तालुकाध्यसंघटक अशोक धुंदकर, लोकशाही पत्रकार संघाचे सचिव अशोक माने, सहसचिव रंगनाथ काकडे इत्यादी उपस्थित होते.समाजातील विविध समस्यांवर निर्भिडपणे पत्रकारिता करणारे म्हणून ठाकूर यांची ओळख आहे . सामाजिक कार्यात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.अभ्युदय म्हणजेच सर्वतोमुखी कार्यातून समाधान शोधणारे हे व्यक्तिमत्व सर्वांसाठी आदर्शवत कार्य करत आहे.

# लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते सोमठाणा येथे गोशाळेचा भव्य शुभारंभ

## गाय आणि गोपालनाचे गुरुजींनी सांगितलं महत्त्व

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड पाटील**

सोमठाणा ता.भोकर जि.नांदेड येथील श्री गोविंद कृष्ण गोशाळेचा भव्य शुभारंभ सोहळा दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडला. या सोहळ्यात प्रमुख उपस्थिती म्हणून व्ही.पी.के उद्योग समूहाचे अध्यक्ष मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी यांची होती.त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. गुरुजींनी आपल्या भाषणात गाईचे महत्त्व आणि गोपालनाचे महत्त्व व्यक्त केले.





गुरुजींनी सांगितले की, गाय आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ती फक्त एक पाळीव प्राणी नाही, तर आपल्या संस्कृतीतील एक महत्वाची भूमिका निभावणारी आई आहे. भारतीय परंपरेत गाईला अत्यंत आदर दिला जातो, कारण तिच्या माध्यमातून जीवनात पवित्रता आणि समृद्धी येते. गुरुजींनी आपल्या भाषणात असेही प्रतिपादित केले की, गाय म्हणजे आपली आई आहे, जिच्या मध्ये आपण ३३ कोटी देवतांची शक्ती मानतो.

यावेळी गुरुजींनी गोमूत्र आणि गाईचे शेण यांचे महत्त्वही सांगितले. ते म्हणाले, गोमूत्र आणि गाईचे शेण आयुर्वेदिक औषधी म्हणून वापरले जातात. यामुळे अनेक आजारांवर उपचार होऊ शकतात. या विचारांमुळे उपस्थित लोकांनी गाईच्या पवित्रतेविषयी अधिक जागरूकता दाखवली.

# हमीभावाने तूर खरेदी ऑनलाईन नोंदणीसाठी ३० दिवसांची मुदतवाढ पणन मंत्री जयकुमार रावल



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगांव | संदीप कदम**

हंगाम २०२४–२५ मधील हमीभावाने तूर खरेदीसाठी दि. २४ जानेवारी २०२५ पासून पुढे ३० दिवसांपर्यंत शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणीबाबत कळविण्यात आले होते. ही मुदत आणखी ३० दिवस वाढविण्यात येत असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे.दि. २४ फेब्रुवारी २०२५ अखेर राज्यात २९ हजार २५४ शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून १६१ शेतकऱ्यांकडून १८१३.८६ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना नोंदणी करता यावी यादृष्टीने ही मुदतवाढ देण्यात आली असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

# उन्हाळ्यात आरोग्याची घ्यावयाची काळजी!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

आतापासूनच उन्हाळ्याची उष्णता जाणवत आहे. उन्हाळ्यात उष्णता वाढल्यानं आरोग्यविषयक अनेक समस्या डोकं वर काढत असतात. शिवाय ऋतुमानानुसार आहारशैलीत बदल केल्यास आरोग्य उत्तम ठेवण्यास तेवढीच मदत होते अन् निरोगी राहण्यास मदत होते.यंदा फेब्रुवारी महिन्याच्या आखेरीपासूनच मे महिन्यातील उष्णता जाणवायला लागली आहे. उष्णता वाढली की, अनेक आजार देखील अचानक डोकं वर काढतात. अशावेळी तब्येतीची काळजी घेणे खूपच गरजेचे असतं.

उन्हाळ्यात उष्माघात, जंतुसंसर्ग, डायरिया, कावीळ, टायफॉईड, लहान मुलांमधील जंतुसंसर्ग, गोवर, कांजण्या, गलगंड, डोळ्यांचे विकार, त्वचेचे आजार वाढण्याची शक्यता अधिक असते. उन्हाळ्यात घामाच्या रुपाने उष्णता बाहेर पडत असते. त्यामुळे शरीराच्या आतील आणि बाहेरील त्वचा कोरडी पडत असते. अशावेळी शरीराला पाण्याची अत्यंत गरज असते. यासाठी वेळोवेळी पाणी पित राहाणं गरजेचं असतं.

**उन्हाळ्यात त्वचेची कशी काळजी घ्याल?**

सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करण्यासाठी चेहरा मऊ कापडाने बांधून घ्या

त्वचेच्या डेड सेल्स वेळोवेळी काढून टाकाव्यात त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि फळांचं सेवन वाढवा.

उन्हाळ्यात दोन वेळा आंघोळ करणं फायद्याचं ठरू शकतं.

नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि भरपूर पाणी पिणं आदी बाबींचं पालन करणं गरजेचं असल्याचं डॉक्टरदेखील सांगत असतात. त्यामुळे उन्हाळ्यात आहारात बदल करणं आवश्यक आहे. उन्हाळ्यात पचायला हलका आणि कमी आहार



घ्यावा. टरबूज, खरबूज, संत्री, मोसंबी, केळी, काकडी फळांचं सेवन वाढवावं. थंड तुपाचाही आहारात सामावेश करावा. नारळ पाणी, ऊसाचा रस, कोकम सरबत प्यायल्याने उष्णतेचा त्रास कमी जाणवेल. याशिवाय मांसाहार टाळावं आणि भरपूर पाणी प्यावं. याशिवाय उष्माघाताचा त्रास होत असलेल्या रुग्णाला जास्तीतजास्त द्रव आहार द्यावा तसेत ताप कमी होत नसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**शरीर हायड्रेटेड ठेवा**

पाण्याअभावी उन्हाळ्यात अनेकदा डिहायड्रेशनची समस्या उद्भवते. यामुळे अनेक जण विविध आजारांना बळी पडतात. अशा परिस्थितीत जर तुम्हाला उष्णतेपासून स्वत:चा बचाव करायचा असेल, तर स्वतःला पूर्णपणे हायड्रेटेड ठेवणं आवश्यक आहे. यासाठी जास्तीत जास्त पाणी पिणं गरजेचं आहे. याशिवाय हंगामी फळे आणि भाज्यांचे सेवन करा. याशिवाय लिंबू पाणी, लस्सी यांसारखी पेये प्या. गरज पडल्यास ओआरएस घ्या.आतापासूनच उन्हाळ्याच्या सुरुवातीपासून आपले आरोग्य उत्तम आणि निरोगी राहण्यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे.

**–डॉ.सविता खरात ( ग्लोबल हॉस्पीटल ) वाघोली, पुणे**

## देगलूरच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाला खिंडार

# राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष विक्रम नागशेट्टीवार यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित दादा पवार) गटात प्रवेश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**देगलूर । धनाजी जोशी**



देगलूरच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाला खिंडार,राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून महाविकास आघाडीतील कळती काही थांबायचे नाव घेत नाही, राज्यात महायुतीचे सरकार जनसामान्यांसाठी घेतलेल्या धोरणानां मुळे आणि जनतेचा कौल महायुतीकडे असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये आपले नशीब अजमावन्याच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील उपजिल्हा असलेल्या देगलूर नगर परिषदेत निवडणूक लढविण्याच्या उद्दिष्टाने आपली जागा आरक्षित करण्याच्या दृष्टीने हि सर्व बाब लक्षात ठेवुन व पक्षप्रमुख अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या कार्यशैलीवर प्रेरित होऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते व दिंगबर कौरवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष विक्रम नागशेट्टीवार यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित दादा पवार) गटात प्रवेश करण्यात आला यावेळी दिंगबर कौरवार राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे मुकनर यांच्या समवेत जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते..

# बौद्ध धम्माच्या प्रभावातूनच शिवशाही पासून लोकशाही पर्यंतचा प्रवास–प्रबुद्ध साठे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

२१ व्या शतकातील लोकशाहीचे मूल्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाही काळात लोकाभिमुख होती, भगवान बुद्धांचे बोट धरूनच शिवशाही पासुन लोकशाही पर्यंतचा प्रवास झाला,बौद्ध धम्माच्या प्रभावातूनच शिवशाही पासुन लोकशाही पर्यंतचा प्रवास हा खरा इतिहास असून छत्रपती शिवाजी महाराज हे बौद्ध राजे होते असे प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख व विश्व बौद्ध परिषदचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले ते बामसेफ पंढरपूर सोलापूर जिल्हा युनिट आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त व भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त आयोजित शिवशाही पासुन लोकशाही पर्यंतचा प्रवास या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते,कार्यक्रमाचे अध्यक्ष बामसेफ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सचिन भंडारे गुरूजी होते,प्रबुद्ध साठे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, अस्पृश्यता व जातीव्यवस्था मोडून छत्रपती शिवाजी महाराज यांनी समाजक्रांतून राज्यकांती केली.१० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखान लढाईच्या वेळी कृष्णा कुलकर्णीला ठार मारून मनुस्मृती जाळली तसेच रांझ्याच्या पाटलाची हातपाय तोडण्याची शिक्षा देवून शिवरायांनी अट्रासिटी अक्ट ची अंमलबजावणी केली,म्हणूनच शिवचरित्रातून उर्जा घेऊन सम्राट अशोक व छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व डोळ्यासमोर होते म्हणून संविधान लिहताना मला थकवा आला नाही असे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते व त्यांनी बौद्ध धम्माचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भारतीय संविधानाची निर्मिती करुन लोकशाही भारत उभा केला.याप्रसंगी बामसेफ राज्य प्रवक्ते सुनील आडगळे यांचे ही प्रासंगिक भाषण झाले,यावेळी विठ्ठल कांबळे सर,राजू वाघमारे गुरूजी,धनाजी आडगळे, प्राचार्य राजेंद्र पाराध्ये,भाऊ कांबळे, शशिकांत कांबळे,हारचंद पावरा, नामदेव सरवदे,लक्ष्मण बंगाळे, महसूल सुक्षा अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल शीलरत्नसले (भाळवणी) तसेच मदतड अभियंता अनुराधा कसबे (खरसोळी) यांचा सन्मान करण्यात आला सूत्रसंचालन तालुका अध्यक्ष दतात्रय कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष जालिंदर गायकवाड यांनी केले.

# लिफ्ट आणि स्काय वाकचे काम जलद गतीने पूर्ण करा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कंत्राटदारांना सक्त सूचना





**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**माहूर । राजकिरण देशमूख**

नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिनांक २६ रोजी माहूर येथे भेट देऊन माहूर गडावरील श्री रेणुका देवी संस्थान येथे सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्कायवाकच्या कामास भेट देऊन कंत्राटदारांनी काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सक्त सुचना देत श्री रेणुका मातेचे दर्शन घेतले यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तहसीलदार किशोर यादव,यांचे सह अधिकारी उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी त्यांचा सत्कार केला तसेच रेणुका माऊली व्यापारी असोशियन चे अध्यक्ष मनोज घोगरे, राजू सौंदलकर यांनी व्यापारी हिताच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांना दिले.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर दौऱ्यात माहूर गडावरील तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेल्या टुरिस्ट फॅसिलिटी सेंटर येथे भेट देऊन सर्वप्रथम पाहणी केली तसेच येथे भाविकांना सुविधा सोयी सुरक्षा बाबत माहिती घेत येथे पार्किंगसाठी उभारण्यात आलेल्या जागेची सुद्धा पाहणी केली यानंतर त्यांनी गडावरील सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय वाकच्या कामांची पाहणी करत येथील कंत्राटदार व अधिकाऱ्यांना काम जलद गतीने पूर्ण करण्याची सक्त सूचना केल्या यानंतर त्यांनी श्री रेणुका माता मंदिरात जाऊन दर्शन घेत आरती केली यावेळी विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांचे कडून त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सर्व विश्वस्त पुजारी कर्मचारी सुरक्षा रक्षक उपस्थित होते

दर्शनानंतर विश्रामगृह येथे लिफ्ट आणि स्कायवाकच्या कामात उठवले जाणारे व्यापारी आणि जिल्हाधिकारी यांच्या समन्वय बैठक झाली यावेळी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे तहसीलदार किशोर यादव वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड सहाय्यक अभियंता रवींद्र उमाळे सहाय्यक अभियंता आकाश राठोड प्रोजेक्ट मॅनेजर विडेकर आणि माने यांचे सह मान्यवरांची उपस्थिती होती.

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी बाल बाल बचावला

# हिवरा गायकवाड येथील घटना शेतकरी सुधीर शेळके यांच्यावर रानडुकराचा हल्ला

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**सेनगाव । महादेव हरण**


सेनगाव तालुक्यातील हिवरा (गायकवाड) येथील शेतकरी सुधीर शेळके हे दि, २५ फेब्रुवारीला आपल्या शेतामध्ये काम करत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला यामध्ये सुधीर शेळके यांच्या पायाला मोठी दुखापत झाली असून त्यांना तातडीने वाशिम येथील खाजगी रुग्णालयांमध्ये नेण्यात आले होते यामध्ये त्यांच्या पायाला २८ टाचे बसले असून हिवरा गावामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले तर वन विभागाने रानडुकराचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्याकडून केली जात आहे,




# पेठवडज येथील परफेक्ट इंग्लिश स्कूल मध्ये विज्ञान प्रदर्शन व पालक मेळाव्याचे आयोजन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आंबुलगा । सुर्यभान बिजलगावे**



पेठवडज ता कंधार जि.नांदेड येथील भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित परफेक्ट इंग्लिश स्कूल मध्ये दि.२८/०२/२०२५ शुक्रवार रोजी परफेक्ट इंग्लिश स्कूल च्या वतीने संस्थेचे सर्वेसर्वा गोविंदराव केंद्रे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे गोविंदराव केंद्रे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले की विद्यार्थ्यांना विज्ञान विषयात रस निर्माण होण्यासाठी.विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच विद्यार्थी परफेक्ट इंग्लिश स्कूल मध्ये काय शिक्षण घेतात त्याची माहिती होण्यासाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच पालकांनी परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज येथे दि.२८ फेब्रुवारी रोजी येऊन दोन्ही कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन परफेक्ट इंग्लिश स्कूल चे सर्वेसर्वा गोविंदराव केंद्रे साहेब यांनी केले आहे.



**देगलूरच्या जुन्या बसस्थानकाजवळील खांब कोसळण्याच्या मार्गावर असुन मोठी दुर्घटना होण्या अगोदरच देगलूर नगर परिषदेला जाग येईल काय ? (लोकनेता न्युज नेटवर्क देगलुर)**

## मदनापूर शिवारात रोही वन्य प्राण्याचा मृत्यू

# वन कर्मचाऱ्याचा हलगर्जीपणाचा कळस; पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न, मृत्युनंतर तातडीने जमिनीत गाडले

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**माहूर । राजकिरण देशमूख**

वन्य प्राणी रोही चा तडफडून मृत्यू झाल्याची घटना दि.२४ रोजी मदनापूर शिवारात घडली असून वन विभागाकडून रोह्याचे प्राण वाचविण्यासाठी थातूर मातुर प्रयत्न करण्यात आले असल्याने वन्यजीव प्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिकांत संताप व्यक्त केल्या जात आहे.

दि.२२ रोजी मौजे मदनापूर शिवारातील दत्ता उकंडराव दालपे यांचे शेतात जंगलातून भटकत आलेला रोही (निलगाय) नर जातीचा जमिनीवर पडलेला आढळून आल्याने शेतकऱ्याने वन विभागाच्या माहूर वन परिक्षेत्र अधिकाऱ्यास कळविल्यानंतर वन विभागांचे संबधित वनरक्षक कर्मचारी श्रीमती यु.जि सोनटक्के यांनी घटनास्थळी भेट देऊन रोही निलगायच्या प्रकृतीची पाहणी केली व पशु वैद्यकीय अधिकारी यांना बोलावून त्याचा उपचार सुरु केला. मात्र त्यानंतर आजारी असलेल्या रोहीकडे फिरकून पाहिले नाही व पुढील कोणताही उपचार करण्याचे औदार्य न दाखविल्याने दोन दिवस जागेवरच उन्हात तडफडून दि. २४ रोजी रोहीचा मृत्यू झाला. मृत्यूची बातमी मिळताच



घाई गडबडीने कोणतेही शवविच्छेदन व उत्तरीय तपासणी न करताच त्याच शेतात जमिनीत गाडून टाकण्यात आले.सदर बाब ही अत्यंत गंभीर असल्याने मदनापूर येथील वन्यजीवप्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिक राजू पुंडलिक टनमने यांनी वन परिक्षेत्र अधिकारी माहूर यांना लेखी निवेदन देऊन रोहीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करून हलगर्जी पणा करणाऱ्या संबंधित वन कर्मचाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागनी केली आहे. निवेदनाच्या मुख्य वन संरक्षक अधिकारी छत्रपती संभाजी नगर , वन संरक्षक अधिकारी नांदेड, उप वन संरक्षक अधिकारी नांदेड, सहाय्यक उप वन संरक्षक अधिकारी किनवट यांना सादर केल्या आहेमाहूर तालुका वनपरिक्षेत्राधिकारी रोहित जाधव यांना संपर्क केला असता फोनवर कसलाही प्रतिसाद मिळाला नाही



# महिना उलटूनही जलजीवनच्या कामाची माहिती देण्या साठी उपविभागीय अभियंता मालोकर यांची टाळाटाळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

मातृतीर्थ तालुक्यातील ८२ कोटी रुपयांची जलजीवन ची कामे चालू असून त्यात बट्याबोळ करून संबंधित अधिकारी व ठेकेदारांनी कोट्यवधी रुपयाचा घोटाळा केल्याचा प्रकार पुढे आला होता. यांच्या बातम्या तालुक्यातील नामांकित वृत्तपत्रांनी प्रकाशित केल्या आहे. तसेच पाणीपुरवठा विभागाच्या तक्रारी देखील अनेक नागरिकांनी केलेल्या आहेत. मात्र यावर विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे चौकशी केलेली नाही.

तालुक्यात झालेल्या कामाची बिल किती निघली आहेत या संदर्भात माहिती देण्यासाठी सिंदखेड राजा उपविभागीय अभियंता मालोकर यांना फोन केला असता. आज बाहेर, मीटिंग ला आहे. उद्या या असे उडवा उडविची उत्तरे त्यांनी वृत्तपत्रांच्या संपादकांना, पत्रकारांना दिली. महिना उलटूनही आज पर्यंत त्यांनी माहिती देण्याचे कष्ट घेतले नाही. त्यांच्या कार्यालयाला भेट दिली असता ते अनेक वेळा हजर देखील नसल्याचे कळाले. मात्र उपविभागीय अभियंता मालोकर यांना माहिती देण्यास हरकत असेल तर त्यांनी तसे सांगितले का नाही? केवळ नंतर कॉल करतो असे असे उत्तरे दिली.




### १० टक्यात सेटलमेंट झाल्याची सूत्रांची माहिती

जलजीवन मिशनच्या कामाची चौकशी व्हावी अशी मागणी विश्व फाउंडेशन मार्फत जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांना करण्यात आली होती व पालकमंत्र्यांनी आढावा बैठकीत जलजीवन मिशनचा मुद्दा घेतल्या ची माहिती मिळाली होती. मात्र त्यानंतर आता १० टक्यात आर्थिक देवाण घेवाण होणार असल्याची अधिकृत सूत्रांकडून माहिती. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना मिळाली. परंतु ही माहिती नावे न छापण्याच्या अटीवर सूत्रांनी दिली आहे. सदरील १० टक्के रक्कम ही कोणाकडे द्यायची ही माहिती अधिकृत नसली तरी जिल्ह्यातील एका वरिष्ठ कार्यकर्त्याकडे दिली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या १० टक्याची सेटलमेंट झाल्यास तालुका तहानलेलाच राहील यात मात्र आता शंका नाही.



दि. २६ रोजी महाशिवरात्रीनिमित्त श्री रामेश्वर मंदिर येथे रामेश्वर मंदिर समिती मातृतीर्थ सिंदखेड राजा यांच्यावतीने दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांचा सत्कार करण्यात आला.. याप्रसंगी रामेश्वर मंदिर समिती अध्यक्ष बाळू म्हस्के, मा. छगनदादा मेहेत्रे व गुरुवर्य प्रशांत मापारी... (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)

# डॉ शंकरराव चव्हाण व कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृती प्रित्यर्थ नांदेड येथे तिन दिवसीय संगीत शंकर दरबाराला प्रारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतमराव बनसोडे**

माजी केंद्रीय मंत्री डॉ. शंकरराव चव्हाण व सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृती प्रित्यर्थ यंदाही नांदेड येथे दि.२६ फेब्रुवारी २०२५ बुधवार पासून २७,२८ फेब्रुवारी पर्यंत तीन दिवसीय संगीत शंकर दरबारला दि.२६ फेब्रुवारी रोजी प्रारंभ झाला. प्रख्यात गायिका श्रीमती अनुराधा नांदेडकर यांचा उद्घाटनीय सोहळ्यात जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, प्रख्यात सतार वादक पद्मभूषण पं. बुधादित्य मुखर्जी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, नांदेड-वाघाळा शहर महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी पी सावंत, महानगराध्यक्ष अमरभाऊ राजुरकर, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अनंतराव घारड यांना याप्रसंगी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.






# शिवजयंती निमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित तृतीय रत्न महानाट्य सादर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे रयतेचे राजे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव निमित्त रविवार आणि सोमवार असे दोन दिवशीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मागील ३ वर्षांपासून लिंबागणेश येथे डीजे मुक्त तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातुन शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येतो. रविवारी ( दि.२३ फेब्रुवारी) रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित तृतीय रत्न महानाटकाचे आयोजन करण्यात आले होते. लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रा. लेनाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून भालचंद्र विद्यालयातील ८-९ वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी नाटक सादर केले या नाटकास ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी सोमवार दि.२४ रोजी सायंकाळी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सजवलेल्या रथातून छत्रपती शिवरायांची प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली विशेष आकर्षण म्हणून संगमेश्वर हलगी पथक कुर्ला बीड, तसेच खालसा स्पोर्ट अकॅडमी पाटोदा यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयातील ढोल पथक आणि लेझीम पथकाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.यासाठी शाळेचे शिक्षक सचिन वाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपले योगदान दिले. शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# लोहा कंधार मतदारसंघात भास्करराव पाटील शिंदे जोमेगावकर यांच्या मुळे भाजपाचे कमळ फुलणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

लोहा-कंधार तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत कमळ फुलवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने जय्यत तयारी केली असून, या विधानसभा मतदारसंघातील स्थानिक नेत्यांनी त्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी चालवली आहे. यामध्ये एकनाथ पवार यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे माजी जि.प. सदस्य ॲड. विजय धोंडगे, माजी जि.प. सदस्या सौ. संगीताताई धोंडगे, भास्कर पाटील जोमेगावकर यांच्यासारखे तरुण, आक्रमक नेतेही भारतीय जनता पक्षात दाखल झाले आहेत. लक्षवेधी बाब म्हणजे हे सर्व नेते दोन्ही तालुक्यात ॲक्टिव्ह मोडवर आहेत. नवे लोक जोडून पक्षाची बांधणी मजबूत करण्याचे काम ताकदीने सुरु आहे. मूळचे याच लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे भूमिपूत्र असलेले भास्करराव पाटील शिंदे जोमेगावकर यांनी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, महामंत्री कौडगे, जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे, महानगराध्यक्ष अमरभाऊ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे . भास्करराव पाटील हे माजी मुख्यमंत्री चव्हाण यांच्या तालमीत तयार झालेले नेते आहेत त्यामुळे त्यांचा कार्यकर्ते व मतदारांमध्ये चांगला प्रभाव आहे. त्यांनी भाजपा पक्षाच्या मजबुतीसाठी काम सुरु केले आहे. तसेच त्यांच्या सोबत एकनाथ पवार, धोंडगे परिवार, चंद्रसेन पाटील, बालाजी पांडागळे, शरद पवार पाटील आदी सर्व नेत्यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे लोहा कंधार तालुक्यात भाजपाची ताकद वाढली आहे.त्यामुळे लोहा कंधार तालुक्यात कमळ फुलणार आहे.



## अपघातात श्रीराम शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन आर.आर.मठदेवरु यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । प्रतिनिधी**

देगलूर येथील साधनानगर मध्ये वास्तव्यास असणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवनआप्पा रामलिंगआप्पा मठदेवरु (आर . आर.मठदेवरू) यांचे पुणे सोलापूर महामार्गावर भिगवन जवळ कार अपघातात बुधवारी ता.२६ रोजी पहाटे ५ वाजता दुखद निधन झाले.



ते पुणे येथील आपल्या मुलाला भेटण्यासाठी सोमवारी पुणे येथे गेले होते. तेथून परत देगलूरकडे येत असताना त्यांच्या कारला एका ट्रकने समोरासमोर जोराची धडक दिली. झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. ते श्रीराम शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन होते. व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नरंगल येथे पदोन्नत मुख्याध्यापक मधून जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी ,दोन मुले ,एक मुलगी जावई, नातू ,पणतू असा परिवार आहे. बुधवारी सायंकाळी ५ ते ६ यादरम्यान त्यांचे साधना नगर येथील निवासस्थानी अंतिमदर्शन घेता येणार आहे. सायंकाळी ६:३० वाजता मोघा मंडळ मदनुर( डोंगळी जिल्हा कामारेडी येथील त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंतिमसंस्कार केले जाणार आहेत .ते जिल्हा परिषदेच्या सहशिक्षिका चंद्रकलाबाई मठदेवरु यांचे पती होत.

# भक्ती मार्गच विकृत माणसांना संस्कृत मार्ग दाखवितो-शि.भ.प.शिवानी दिदी लोहगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

ज्या घरामध्ये भक्ती मार्गाचे संस्कार नसतात म्हणून संसाराची घडी विस्कटलेली दिसते त्या घरामध्ये कधीच सुखप्राप्ती दिसत नाही आपल्या घरात आचार विचार रुजले जावे, आणि संसारात मन रमण्याचा एकच मार्ग तो म्हणजे भक्ती मार्ग होय, भक्ती मार्गाने विकृत माणसांना संस्कृत मार्ग दाखविते असे गोड अमृतवाणी विचार कीर्तनकार शि.भ.प.शिवानी दीदी लोहगावकर यांनी कीर्तन रुपी सेवेत दिले.

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी पासून प्रारंभ झालेला आहे,कीर्तनाच्या पाचव्या दिवशी कु. शिवानी दीदी लोहगावकर यांनी आपली किर्तन रुपी सेवा करताना मन्मथ पांडे, उत्तम पाटील धानोरकर, गणेश मुरुडकर, रामदास वसमते, शिवानी लोहगावकर,मारुती मंगनाळे बैठकबिलोलीकर, प्रसिद्ध बासरी वादक विजयकुमार द्रोणाचार्य यांनी संगीताची साथ त्यांना दिली आहे सदर शिवनाम सप्ताह दिनांक २७ फेब्रुवारी रोजी संपणार असून या रोजी दुपारी गावकऱ्या तर्फे सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले व २८ फेब्रुवारी रोजी जंगी कुस्त्यांचा फड होईल.




कु. शिवानी दीदी लोहगावकर ह्या आपल्या कीर्तन रुपी सेवेत पुढे म्हणाल्या की, प्रत्येक कुटुंबात मा जिजाऊ सारखे विचार असावे तरच छत्रपती शिवाजी महाराजांसारखे धैर्यवान व बलवान आपली मुलं निर्माण होतील असे सांगत सर्व धर्मीय शिवनाम सप्ताह आहे तसे विचार देखील सर्व समावेशक असावे ही शिकवण प्रत्येकात रुजली जावी तेव्हाच आपणास संस्कारमय होता येईल असे संस्कृत बोध विचार त्यांनी दिले.यावेळी माजी सरपंच मारोतराव पाटील सालेगाये, संजय पाटील आनेराये, ज्येष्ठ नागरिक पुंडलिक पाटील आनेराये, उत्तम पाटील पांडे, किशनराव पांचाळ,राजेश पेहलवान आनेराये,मलिकार्जुन मठपती,दिगाबर पेदे,शिवा पाटील आनेराये, गजानन पा.धम्मे, माधव नारायण पा.आनेराये, गंगाधर कुंभार, माधव भाऊराव पाटील आनेराये, यासह शेळगाव व परिसरातील महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### आगेमोहुळाने चावा घेतल्याने शेतकऱ्याचा मृत्यू जवळा बुद्रुक येथील घटना

# शेतात हरभरा गोळा करण्यासाठी गेलेल्या तिघांना केला जावा एकाचा मृत्यू तर दोघे जखमी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथे सकाळी हरभरा गोळा करण्यासाठी गेलेल्या तीन शेतकऱ्यावर आगेमहोळाने अचानक चावा केला असून यामध्ये एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना दि २६ फेब्रुवारी रोजी घडली असून जवळा बुद्रुक येथील शेतकरी हरभरा गोळा करण्याकरिता शेतामध्ये गेले असता अचानक आगे मावळाणे तीन शेतकऱ्यावर चावा केला असून यामध्ये शेतकरी भास्कर नाथराव खिल्लारे वय वर्ष ४८ असून बाबुळगाव शिवारामध्ये हरभरा गोळा करण्यासाठी शेतामध्ये गेले असता त्यांच्यावर अचानक माशांनी हल्ला केला तर त्यांना हिंगोली येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले,



## दगडूशेठ हलवाई ट्रस्ट: सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आदर्श

# वराडकर महाविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दापोलीला येणार!


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

दापोली येथील वराडकर बेलोसे महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या निमंत्रण देण्याच्या निमित्ताने प्राचार्य डॉ. भारत कराड यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष श्री सुनील रासने यांची भेट घेतली. यावेळी आंतरराष्ट्रीय परिसंवाद प्रमुख पाहुणे म्हणून मी नव्हे तर स्वतः श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दापोलीला येणार याची ग्वाही देऊन श्री रासने यांनी ट्रस्टच्या विविध उपक्रमांचे आणि सामाजिक कार्याचे महत्त्व स्पष्ट केले.

यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे ट्रस्टी श्री तुकाराम रासने, अन्य ट्रस्टी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. रासने यांनी सांगितले की, दगडूशेठ हलवाई ट्रस्ट मराठी माध्यमात शिकत असलेल्या शाळांमधील ५०० पेक्षा अधिक अनाथ विद्यार्थ्यांना मोफत सुविधा पुरवतो. त्यामुळे या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाची संपूर्णता साधता येत आहे. ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांना विविध सुविधा दिल्या जातात, ज्यामध्ये शिक्षण, वैद्यकीय सेवा, चांगला पगार आणि इन्शुरन्स यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ट्रस्टने ७५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षा देण्यासाठी आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. या विद्यार्थ्यांचे संपूर्ण खर्च ट्रस्ट उचलत आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या स्पर्धात्मक परीक्षा तयारीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा मिळत आहेत.श्री रासने यांनी सांगितले की, कुष्ठरोगी व्यक्तींना कामाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ट्रस्टने विविध उपक्रम सुरू केले आहेत. यापूर्वी, कुष्ठरोगी भीक मागून गुजराण करत होते, परंतु आता सुमारे तीनशे कुष्ठरोगी ट्रस्टच्या उपक्रमांत सामील झाले आहेत आणि आनंदाने काम करत आहेत.

वेश्या व्यवसायातील महिलांच्या मुलांसाठी दगडूशेठ हलवाई ट्रस्टने शाळा सुरू केली आहे. यामुळे



त्या मुलांना शिक्षण व अन्य सुविधांची उपलब्धता झाली आहे. काही मुलांनी पुण्यात स्वतःचे फ्लॅट विकत घेऊन आपल्या आई-वडिलांना तिथे शिफ्ट केले आहे, ज्यामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल झाला आहे.श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी गायिका अनुराधा पौडवाल यांच्या मदतीने साधारण ३० ते ४० हजार रुपये किमतीचे प्रत्येकी कानातील श्रवण यंत्र ट्रस्ट द्वारा शंभरहून अधिक मुलांना देण्यात आली आहेत. त्यामुळे ज्या मुलांना ऐकू येत नव्हते, त्यांना आता ऐकू येत असल्यामुळे ते मुख्य प्रवाहात आले आहेत.ससून रुग्णालयामध्ये उपचार घेत असलेल्या सुमारे ३००० गरजू लोकांसाठी दोन वर्षे जेवण, चहा आणि नाश्ता मोफत पुरविण्याची सेवा ट्रस्ट कडून दिली जाते, हे देशातील सर्वात मोठे सेवेचे उदाहरण आहे असे यावेळी डॉ. सुवर्णा कराड यांनी सांगितले.श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे कार्य अत्यंत पारदर्शक असून देणगी व खर्च हिशोब आणि वार्षिक अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहेत. विविध उपक्रमांचे तपशीलवार वर्णन त्यावर दिले गेले आहे.यावेळी प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी ट्रस्टच्या सामाजिक आणि धार्मिक कार्याचे कौतुक केले. त्यांनी दगडूशेठ हलवाई मंदिराची प्रतिकृती कोकणात तयार केल्यास भक्तांना सुविधाजनक होईल, असे मत व्यक्त केले. यावर श्री रासने यांनी प्रतिसाद दिला की, भक्तांच्या हाकेला दगडूशेठ हलवाई नक्की धावून जातात.या प्रसंगी वंजारी महासंघाच्या महिला आघाडीच्या अध्यक्ष सुवर्णा कराड उपस्थित होत्या. डॉ. भारत कऱ्हाड आणि त्यांच्या पत्नीचा श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती समोर सत्कार करण्यात आला. त्यांनी या सत्काराला महत्त्व देत सांगितले की, हा सत्कार आमच्या जीवनातील सर्वात आनंददायी क्षण आहे, आणि श्री सुनील रासने यांनी हे घडवून आणले, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या उपक्रमांनी अनेक जीवनांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. ट्रस्टचे हे सामाजिक कार्य आणि शैक्षणिक उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी आहेत, ज्यामुळे स्थानिक समुदायाला मोठा लाभ झाला आहे. समाजातील वंचित घटकांना संधी देऊन, श्रीमती दगडूशेठ हलवाई ट्रस्ट एक आदर्श उदाहरण निर्माण करत आहे.

डॉ सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र

## बारूळ ते पेठवडज रस्त्यावरील दोन्ही बाजूने वाढलेली काटेरी झुडपे तोडून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**करमाळा । बालाजी जाधव**

बारूळ ते पेठवडज रस्त्यावरील दोन्ही बाजूने वाढलेल्या काटेरी झुडपामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे व रात्रीच्या वेळी दोन्ही वाहन एकमेकांसमोर आले की दोन्ही वाहन चालकांना गाडीच्या लाईटचा प्रकाश एकमेकांचा डोळ्यासमोर येतो व वाहनावरील नियंत्रण करता येत नाही यामुळे मोठा अपघात होण्याची दाट शक्यता आहे व राहटी ते बारूळ हा तर रस्ता पूर्णपणे काटेरी झाला आहे एकावेळी दोन वाहने रोडवर पास होत नाहीत दोन्ही बाजूंनी वाढलेले काटेरी झूडूपामुळे पूर्णपणे रस्ता दिसत नाही तरी ती तोडून वाहतुकीस



अडथळा निर्माण होणार नाही असे दुरुस्ती करून द्यावी अशी मागणी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांच्याकडे जाधव व्यंकट गोविंदराव सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार संघर्ष समिती कंधार व पांडुरंग कंधारे यांनी एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे-दिलीपराव धर्माधिकारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । नबाजी कुडकेकर**



राष्ट्रवादी काँग्रेस उपमुख्यमंत्री अजीत दादा पवार यांचा पक्ष सत्तेत असून बिलोली तालुक्याच्या विकासासाठी सदैव तत्पर राहिल ,हा पक्ष तळागाळात पोहोचला पाहिजे यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांनी केले.

स्वराज्य सप्ताह अंतर्गत सदस्य नोंदणी अभियानास बिलोली तालुक्यात आज प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष धर्माधिकारी, माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुनंदा जोगदंड, जिल्हा संघटक प्रतिभा रत्नपारखी, जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ पाटील सावळीकर आदींची उपस्थिती होती. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पाहुण्यांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला. तदनंतर सदस्य नोंदणीस सुरुवात झाली. यावेळी तालुक्यातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केले, या सर्वांचं जिल्हाध्यक्षांनी शाल पुष्पहाराने स्वागत केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी तालुका अध्यक्ष रंजीत पाटी हिवराळे, शहराध्यक्ष मिलींद पवार, गंगाधर मरकंटे, तालुका महिला आघाडी अध्यक्षा प्रतिभा ईर्लेवाड,निळकंठ दुडले, गणेश शिंदे,गणेश नरवाडे आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.शंकर पवार यांनी मानले तर उपस्थितांचे आभार गंगाधर कुडके यांनी मानले.

## सुनील उत्तमराव वैद्य यांचे उपचार दरम्याननिधन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील सुनील वैद्य (वय ३६) हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. यांचे मंगळवारी (दी.२५/०२/२०२५) उपचारादरम्यान संध्याकाळी पाच वाजतानिधनझाले.त्यांच्या अंत्यविधी चा कार्यक्रम दिनांक २६/०२/२०२५ रोजी दुपारी एक वाजता दानापूर येथील शमशान भूमी मध्ये करण्यात आले.त्यांच्या पश्चात कुटुंबात आई,वडील,एक मुलगा ,तीन भाऊ असा मोठा परिवार आहे.आर्मी जवान अनिल वैद्य यांचे ते लहान भाऊ होते.

## रूद्रापुर येथील रहिवासी लक्ष्मण बंट्टेवाड लोहगाव तलावात बुडून आकस्मिक मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**



बिलोली तालुक्यातील रुद्रापूर येथील रहिवासी लक्ष्मण बट्टेवाड भोई समाज बांधव लोहगाव येथील तलावात बुडून आकस्मित मृत्यु झाल्याची नोंद केली आहे ही घटना सोमवार दिनांक २४/०२/२०२५ रोजी घडली आहे. रुद्रापूर येथे त्यांच्या कुटुंबाला निरोप मिळाला असून मयत लक्ष्मण बट्टेवाड हे भोई समाज समन्वय समिती नांदेड चे पदाधिकारी बिलोली तालुक्याच्या रुद्रापूरचे मलिक अर्जुन बट्टेवार चे वडील मयत लक्ष्मण बट्टेवार समाज बांधवाला पत्नी दोन मुले सून नातेवाईक असून या गरीब परिवाराला शासनाकडून मदत मिळावी यासाठी प्रयत्न चालू आहेत.या कुटुंबाला काळजी पूर्वक भेट देऊन भोई समाज समन्वय समिती नांदेड जिल्हा अध्यक्ष मा. राजू अण्णा मामुलवार साहेब व राजाभाऊ वालगोटवाड, बिलोली तालुका अध्यक्ष बालाजी डुबकवाड बिलोली तालुक्याचे भोई समाज सामान्य समिती उपस्थित होते



चॅलेंज इंग्लिश अकॅडमी शिराढोण येथील इयत्ता दहावीच्या विदयार्थ्यांना संचालक दौलत पांडागळे सर यांनी दहावी बोर्ड परीक्षेसाठी निरोप देऊन शुभेच्छा देताना.(लोकनेता न्युज नेटवर्क शिराढोण)



मुखेड शहरातील प्रसिद्ध हेमाडपंथी महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त तहसीलदार राजेश जाधव यांनी सहकुटुंब परिवारासह महाआरती करून दर्शन घेतले. यावेळी शहरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.(लोकनेता न्युज नेटवर्क मुखेड)



पेठवडज येथील श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीचे सर्वेसर्वा श्री अशोक डावकोरे साहेब व दाजी मालक यांनी स्वयंभू महादेव मंदिराला भेट दिली असता स्वयंभू महादेव मंदिर कमेटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला(लोकनेता न्युज नेटवर्क)

## दक्षिण काशी संगम येथे महाशिवरात्री निमित्त शिव भक्तांनी त्रिवेणी संगम नदीपात्रात केले पवित्र स्नान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**



कुंडलवाडी येथून १० कि.मी.अंतरावर असलेल्या मौजे संगम येथे महाशिवरात्रीनिमित्त संगमेश्वर देवस्थानाचे दर्शन घेण्यासाठी त्रिवेणी संगम नंदी पात्रात पवित्र स्नानासाठी शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती.त्याची प्रचिती दिसुन आली. कुंडलवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेला मौजे संगम येथील संगमेश्वर देवस्थान हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे. या देवस्थानाच्या दर्शनासाठी दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त बिलोली धर्माबाद या तालुक्यासह तेलंगणा राज्यातील शिवभक्त मोठ्या प्रमाणात येतात आज .प्रयागराज येथील महाकुंभात पवित्र स्नानचा शेवटचा दिवस असल्यामुळे संगमेश्वर देवस्थान येथे. मांजरा व गोदावरी नदीचा त्रिवेणी संगम असल्यामुळे या पवित्र नदीच्या स्नानासाठी व संगमेश्वर चे दर्शन करण्यासाठी मोठी गर्दी केल्यामुळे २ किलो मीटर रस्त्यावर ट्रॅफिक जॅम झाल्याचे चित्र दिसून आले त्यामुळे भाविकांना उन्हात पायीं पाय पीट करावे लागत आहे. संगमेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा करण्यात आले आहे तर कट टेक्स्ट करून भाविकांना फळे व साबुदाणा वाटपा करून पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला दि.२७ फेब्रुवारी बुधवार रोजी संगमेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मा.खा.भास्करराव पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्केट कमिटीचे सभापती बाबाराव पाटील भाले ,संचालक आनंदराव पाटील शिंदे, संगमनाथ माली पाटील ,संगम ओम पाटील ,भाले मारुती पाटील दगडे आदी सह ट्रस्टचे अनेक पदाधिकाऱ्यांनी परिक्षम घेतले आहेत यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी होमगार्ड कर्मचारी व पोलीस पाटील यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904